॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

*** सुविचार ***

अपयश म्हणजे संकट नव्हे;
आपल्याला योग्य मार्गावर आणणारे
ते मार्गस्थ दगड आहेत.




अहिल्यानगर | रविवार, दि. २७ एप्रिल २०२५ | वर्ष ६ वे | अंक १७ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

## SPOT NEWS

### सीमेजवळ भर उन्हात बीएसएफचा युद्धाभ्यास

**जम्मू** – पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सीमेला लागून असलेल्या काही भागांना अलर्ट जारी करण्यात आला आहे. सीमेलगतच्या सर्व भागात सुरक्षा यंत्रणांना सतर्क करण्यात आले आहे. गावापासून शहरापर्यंत अलर्ट जारी करतानाच राजस्थानमध्ये लष्कराचा युद्ध सराव सुरू आहे. एलओसी असो किंवा वाळवंटातील रणरणत्या उन्हात भारतीय लष्कराचा युद्धाभ्यास सुरू असून, लष्करी यंत्रणा सर्वत्र सज्ज असल्याचे पाहायला मिळत आहे. भारत-पाकिस्तानच्या सीमेवर सैन्याची २४ तास गस्त सुरू आहे. जैसलमेर येथील सीमा रेषेवर भारतीय बीएसएफचे जवान पूर्णपणे तैनात करण्यात आले आहेत. एलओसीवर वाढलेल्या तणावामुळे बीएसएफचे जवान हाय अलर्ट मोडवर आहेत. अशातच अलर्ट जारी करण्यात आल्यानंतर जैसलमेर येथील सीमा रेषेवर दुपारचे तापमान ४५ अंशांवर असलेल्या कडक उन्हात बीएसएफच्या जवानांचा सराव सुरू आहे.

### २०३४ पर्यंत फडणवीसच मुख्यमंत्री : बावनकुळे

**मुंबई** – महसूल मंत्री आणि भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठे भाकीत केले असून त्यावरून राज्यात चर्चेला उधाण आले आहे. सन २०३४ पर्यंत देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री असतील असे वक्तव्य चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. त्याला एकनाथ शिंदे यांच्या एका कृतीची किनार आहे. महायुतीचे सरकार आल्यानंतर मुख्यमंत्री पदावरून झालेले नाट्य उभ्या महाराष्ट्राने पाहिले. एकनाथ शिंदे अचानक गावी गेले. तिथून ठाण्यात आले. त्यानंतर दिल्लीतील बडे नेते आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी त्यांची चर्चा झाली. यापूर्वी मुख्यमंत्री असलेले एकनाथ शिंदे यांनी नंतर उपमुख्यमंत्री पद स्वीकारले. महायुतीत पालकमंत्री पदावरून टोकाचे वाद दिसले. पण बडे नेते याविषयीची कोणतीही कटुता सार्वजनिकपणे न मांडण्याची प्रथा मोडत नाहीत हे विशेष. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जातीने तिथे हजर राहिले. त्यांनी तिथे जाऊन महाराष्ट्रातील पर्यटकांना दिलासाच दिला नाही. तर त्यांची महाराष्ट्रात परतण्याची व्यवस्था केली. जखमींची भेट घेतली. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री गिरीश महाजन यांना मदतासाठी पाठवले होते. पण ही श्रेयवादाची लढाई असल्याचे बोलले जात होते.


# बिनविरोधसाठी किमान मतांची टक्केवारी अनिवार्य?

## सर्वोच्च न्यायालयाची केंद्र सरकारकडे विचारणा

**नवी दिल्ली । वीरभूमी–** सर्वोच्च न्यायालयाने बिनविरोध विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. एकट्या उमेदवारांसाठी किमान मतांची टक्केवारी अनिवार्य करण्याचा सल्ला केंद्र सरकारला दिला. निवडणूक कायद्यात केवळ एकच उमेदवार निवडून आल्याचे घोषित करण्यासाठी रिंगणात असतानाही विशिष्ट टक्केवारी मते अनिवार्य करणे शक्य आहे का, अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली.

दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाचे अध्यक्ष न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी केंद्र आणि निवडणूक आयोगाला याबाबत विचारणा केली. न्यायमूर्ती एन. के. सिंह यांचा समावेश असलेल्या खंडपीठाने विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी या संस्थेच्या याचिकेवर सुनावणी केली. यात त्यांनी लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या थेट निवडणुकांना लागू असलेल्या लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम ५३ (२) ला असंवैधानिक म्हणून वाचून दाखवावे किंवा रद्द करावे. या तरतुदीनुसार बिनविरोध निवडणूक झाल्यास निवडणूक आयोग निवडणूक न घेता एकमेव विद्यमान उमेदवाराला ताबडतोब विजयी घोषित करते, असे म्हटले.

ज्येष्ठ वकील अरविंद दातार म्हणाले की, एका मतदारसंघातून ३-४ उमेदवार नामांकन दाखल करतात आणि शेवटच्या



दिवशी एक वगळता सर्व उमेदवार माघार घेतात. जर मतदारसंघात १ लाख मतदार असतील, ज्यांपैकी १० हजार उमेदवारांना मतदान करायचे असेल. परंतु २५ हजार लोक नोटाला मतदान करायचे असतील तर त्यांना तसे करण्याचा अधिकार नाही का? त्यांच्या युक्तिवादाला आव्हान देत ज्येष्ठ वकील राकेश द्विवेदी म्हणाले की, गेल्या २५ वर्षांत अशी फक्त एकच घटना घडली, जिथे निवडणूक बिनविरोध झाली अन्यथा नेहमीच निवडणूक झाली आहे. यावर न्यायमूर्ती कांत यांनी याचा विचार केला तर एक चांगली सुधारणा असेल, असे म्हटले.

न्यायमूर्ती कांत यांनी या न्यायालयाच्या निकालानंतर तुम्ही मतदाराने केलेली इच्छा व्यक्त केल्याचे मान्य केले. पण इथे तुम्ही प्रत्यक्षात असहाय्य आहात, ही परिस्थिती उद्भवू शकते, कदाचित उद्भवणारही नाही. परंतु जर तुमच्याकडे असा प्रस्ताव असेल, जिथे एकापेक्षा जास्त उमेदवारांनी नामांकन दाखल केले आणि शेवटच्या क्षणी इतर उमेदवार गेले आणि फक्त एकच उमेदवार शिल्लक राहिला, तर किमान १०, २० किंवा २५ टक्के मतदारांना मतदान करावे लागेल, असे म्हणू शकता, असे म्हटले.

### कायदा रद्द नाही, तर तरतूद जोडता येईल

केंद्राकडून बाजू मांडताना ॲटर्नी जनरल आर वेंकटरमणी म्हणाले की, जर एखादी गोष्ट इष्ट असेल तर न्यायालय इष्टतेच्या मुद्याकडे पाहील. परंतु तुम्ही त्या कारणास्तव कायदा रद्द करू शकत नाही. यावर न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले की, न्यायालय काहीही रद्द करण्याचा विचार करत नाही तर फक्त एक तरतूद जोडण्याचा विचार करत आहे. आम्ही फक्त तुम्हाला विद्यमान कायद्यात काहीतरी जोडण्यास भाग पाडत आहोत.

## होय वेळ आलीयं एकत्र येण्याची

### शिवसैनिक तयार । ठाकरे गटाची पोस्ट

**मुंबई । वीरभूमी–** महाराष्ट्राच्या राजकारण बदलवून टाकणारी एक मोठी युती भविष्यात होऊ शकते. या युतीचे संकेत दोन्ही ठाकरे बंधुंनीच काही दिवसांपूर्वी दिले होते. राज ठाकरे यांनी अभिनेते, दिग्दर्शक महेश मांजरेकर यांना दिलेल्या मुलाखतीत उद्धव ठाकरे यांच्यासोबतची भांडण फार किरकोळ आहेत महाराष्ट्र मोठा आहे असे विधान केले आणि त्याला तात्काळ प्रतिसाद देत शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी किरकोळ वाद बाजूला ठेवण्यास मी तयार असल्याचे सांगितले. त्यानंतर मनसे आणि शिवसेना एकत्र येण्याची जोरदार चर्चा राज्यभर सुरू झाली.

सध्या दोन्हीही ठाकरे बंधु सध्या परदेशात असल्याने या चर्चेला नेमके कधी मूर्त स्वरुप प्राप्त होईल हे कळू शकले नाही. मनसे शिवसेना युती होते की, ही केवळ चर्चा राहते हे लवकरच कळेल. दरम्यान ठाकरे गटाने एक पोस्ट करत पुन्हा एकत्र येण्याच्या विषयाला हात घातला आहे. सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, मुंबई महाराष्ट्रासाठी एकत्र येण्याची वेळ आली आहे अशा स्वरुपाचा आशय लिहिला आहे. या पोस्टवर कमेंटचा पाऊस पडला असून लवकर एकत्र या, मग कशी मज्जा येते विरोधकांची ते बघायला संपूर्ण महाराष्ट्र आतुर आहे. प्रत्येक मराठी माणूस या क्षणाची आतुरतेने वाट बघतोय. एकदा घोषणा झाली की, मग वादळ आणि फक्त वादळ. राजउद्धव. अशा कमेंटस युजर्सनी केला आहेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्यास म्हणजेच मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाने युती केल्यास त्याचा मोठा फायदा दोन्ही पक्षांना होऊ शकतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे राज्याला नवा पर्याय मिळेल. येत्या काही महिन्यात मुंबई आणि राज्यातील महत्त्वाच्या शहरातील महापालिकांच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे महापालिकेच्या निवडणुकीत दोन्ही पक्षांना फायदा होईल. मुंबई मराठीच्या मुद्यावर दोन्ही पक्षांकडून आक्रमक प्रचार करून महापालिकेत सत्ता स्थापन करता येऊ शकते. जर एकत्र राहिल्यास दीर्घकालिन अनेक फायदे होऊ शकतात.

## मे च्या पहिल्या आठवड्यात १० वी-१२ वीचा निकाल

**पुणे । वीरभूमी–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळतर्फे घेण्यात आलेल्या दहावी झ्र बारावीच्या २१ लाख विद्यार्थ्यांच्या निकालाबद्दल एक महत्वाची माहिती समोर आली आहे. १० वी-१२ वीच्या विद्यार्थांचा लवकरच निकाल लागणार आहे. मे महिन्यात या दोन्ही परीक्षांचा निकाल जाहीर होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बारावीचा, तर दुसऱ्या आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर होईल अशी माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे देण्यात आली. या निकालाच्या तारखा लवकरच जाहीर केल्या जातील असेही बोर्डाकडून सांगण्यात आले. १५ मे पर्यंत निकाल लागू शकतो. मात्र यामुळे विद्यार्थी आणि पालक दोघांचीही धडधड वाढली आहे. यावर्षी ११ फेब्रुवारी ते १८ मार्च पर्यंत १२ वीची परीक्षा झाली होती. यंदा एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर इयत्ता १० वी ची परीक्षा २१ फेब्रुवारी रोजी सुरू झाली ती १७ मार्चपर्यंत होती. विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेसाठी पुरेसा वेळ मिळावा, या हेतूने बोर्डाने यंदाच्या वर्षी परीक्षा आधीच घेतल्या आणि निकालही लवकर जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे.




# अजितदादांच्या ताफ्यावर 'चुना हल्ला'

## 'दादांचे विधान म्हणजे जखमेवर चुना चोळणे । आंदोलक पोलिसांच्या ताब्यात

**परभणी । वीरभूमी –** शेतकऱ्यांनी पीकविमा योजनेत चुना लावला या विधानाचा शेवटी 'परतीचा चुनाच' झाला, शनिवारी उपमुख्यमंत्री अजित पवार परभणी दौऱ्यावर आले आणि त्यांच्या विधानाच्या विरोधात शेतकरी संघटनांचा स्फोट झाला. त्याचवेळी युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अमोल जाधव यांनी 'दादांचे विधान म्हणजे जखमेवर मीठ नाही, तर चुना चोळणे आहे' असा घणाघाती शाब्दिक हल्ला चढवला.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कॉंग्रेस, महाराष्ट्र राज्य किसान सभा व भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्र्यांचा ताफा रोखण्याचा प्रयत्न केला आणि विशेष म्हणजे, 'ताफ्यावर प्रतिकात्मक चुना फेकून', त्यांनी आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. 'चुना लावलाय कुणी, आम्ही की तुम्ही?' असा संतप्त सवाल करत कार्यकर्त्यांनी पवारांच्या विधानाचा तीव्र निषेध केला. काही क्षणातच परिसरात गोंधळ उडाला. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले आणि ताफा पुढे नेण्यात आला.

पोलिसांची तयारी अधिक असल्याने मोठा अनर्थ टळला, पण या सगळ्या घटनेमुळे पवारांच्या परभणी दौऱ्याला राजकीय वादळाचा रंग आला. अजित पवारांनी काही दिवसांपूर्वी पीकविमा योजनेतील अनियमिततेवर बोलताना पीकविमा योजनेत 'शेतकऱ्यांनीच चुना लावला' असे विधान केले होते. हे विधान आगीत तेल ओतल्यासारखे ठरले. आधीच विमा कंपन्यांच्या लाभासाठी चाललेल्या योजनेच्या विरोधात असलेल्या शेतकऱ्यांच्या मनात खदखद होतीच, त्यातच हे विधान आल्यानंतर शेतकर्यांमध्ये संताप होता, तो या चुना आंदोलनातुन प्रकट झाला. तसेच शेतकरी दिवसेंदिवस उद्ध्वस्त होत आहे आणि त्याच्यावर आरोप करणे म्हणजे अन्यायावर शिक्कामोर्तब करणे आहे असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

शेतकरी जर 'चुना' लावतो, तर कंपन्या काय गुलाबपाणी शिंपडतात? पावसाने फसवले, विम्याने झुलवले आणि वर नेत्यांनी दोष दिला, शेतकरी अजून किती गिळायचा? ज्या योजना कंपन्यांना फायदेशीर ठरतात, त्यात शेतकऱ्यांनी कधीच नफा पाहिलेला नाही. आंदोलन करणारे तुरुंगात, आणि 'ताफा' निवांत पुढ, हेच का लोकशाहीचे नवे समीकरण? विधान केल्यावर माफी नाही, पण विरोध केल्यावर अटक, हे समीकरण आता 'चुना नीति' म्हणूनच ओळखायला हवे असे आंदोलकांनी म्हटले आहे.

SPOT NEWS

## अनापवाडी जिल्हा परिषद शाळेत नवोदित विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव

**● नगर । वीरभूमी–**
गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे जिल्हा परिषद शाळा पुन्हा पालकांच्या विश्वासाचा केंद्रबिंदू ठरत असून, राहुरी तालुक्यातील सोनगाव येथील अनापवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा याचे उत्तम उदाहरण ठरली आहे. या शाळेत इयत्ता पहिलीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याचवेळी, इयत्ता चौथी उत्तीर्ण होऊन माध्यमिक शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभही पार पडला. या दोन्ही प्रसंगी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक सागर घोलप, गहिनीनाथ वायदंडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पल्लवी संदीप सजन, चंद्रभान आवडाजी अनाप, अंगणवाडी सेविका अलका अनाप, ललिता धनवट, शकुंतला अनाप, शुभांगी अंत्रे, सुरेखा अनाप यांच्यासह अनेक ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक सागर घोलप म्हणाले की, अनापवाडी शाळेने शिक्षणाच्या माध्यमातून एक सकारात्मक आणि गुणात्मक वातावरण निर्माण केलं आहे. आज जेव्हा पालक आपल्या मुलांना खासगी शाळांपेक्षा जिल्हा परिषद शाळेत दाखल करत आहेत, तेव्हा तो आमच्या शिक्षकवर्गाच्या मेहनतीचा आणि शाळेतील चांगल्या संस्कारांचा विजय आहे. या शाळेचा हेतू केवळ पुस्तकी ज्ञान देणं नाही, तर मूल्याधिष्ठित शिक्षण देऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणं आहे. पालक आणि ग्रामस्थांचा सहभाग हीच आमची खरी ताकद असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वायदंडे यांनी तर संयोजन शिक्षकवर्ग व व्यवस्थापन समितीने केले होते.

## आज कोतुळ येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पदस्पर्श भूमी सोहळा

**● अकोले । वीरभूमी–**
विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अकोले तालुक्यातील कोतूळ येथे महिलांची परिषद घेतली होती. गावामध्ये त्यांचे सर्व समाजांनी एकत्र येत भव्य स्वागत केले होते. या इतिहासाला उजाळा देण्यासाठी येत्या २७ एप्रिलला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदस्पर्श भूमी सोहळा पार पडत आहे. या सोहळ्याला प्रथमच डॉ. बाबासाहेबांचे नातू प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र एकसंघ आहे हे दाखवून देणारा हा सोहळा रविवार दि. २७ एप्रिल रोजी सकाळी १० वा. जान्हवी लॉन्स, कोतूळ येथेआयोजित केलेला आहे अशी माहिती विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदस्पर्श भूमी सोहळा, कोतूळ च्या स्वागताध्यक्ष उत्कर्षाताई रुपवते यांनी दिली. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान ॲड.संघराज रुपवते हे भूषविणार आहेत. या वेळी विशेष अतिथी म्हणून आ. डॉ. किरण लहामटे, माजी आमदार वैभवराव पिचड, जेष्ठ नेते विजयराव वाकचौरे, बाळासाहेब नानासाहेब देशमुख, राष्ट्रीय शेतकरी नेते डॉ. अजित नवले, उद्योजक सुधीर साळवे आदीसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी सकाळी ८ वाजता पंचशील ध्वजारोहण, ८.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक, सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत अभिवादन सभा व त्यानंतर भोजन व्यवस्था केलेली आहे. तरी या कार्यक्रमास सर्व नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष उत्कर्षाताई रूपवते यांनी केले.

# शेवगाव-पाथर्डीतील ८३ तलाव होणार गाळमुक्त

### आमदार मोनिका राजळे | गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अंतर्गत ४ कोटींचा निधी

**● शेवगाव । वीरभूमी–**
शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील ८३ पाझर तलाव, साठवण बंधारे, को.प. बंधारे, सिमेंट नाला बंधारे, यामधील गाळ काढण्यासाठी शासनाच्या गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार मोहिमे अंतर्गत ४ कोटी रूपयांचा निधी मंजुर झाल्याची माहिती आमदार मोनिका राजळे यांनी दिली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, शेवगाव-पाथर्डी मतदारसंघात १९७२ च्या कालावधीत व नंतर शेकडो साठवण बंधारे, पाझर तलाव करण्यात आले होते. परंतु वर्षानुवर्षे पाण्याच्या प्रवाहा बरोबरच वाहून आलेली माती यामुळे या तलावात मोठ्या प्रमाणात गाळ साठला आहे. त्यामुळे साठवण तलावाची पाणी क्षमता कमी होऊन पाझर कमी झाला होता. त्यामुळे पाणीसाठा कमी होऊन शेतकऱ्यांना विधंन विहीरींना पाझराचा फायदा होत नव्हता. त्यामुळे जानेवारी २०२३ मध्ये शासन निर्णयाद्वारे गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना ३ वर्षाकरिता मंजुर केली होती. परंतु आता ही योजना ३ वर्षाकरिता मर्यादित न राहता कायमस्वरूपी राबविण्यात येणार आहे. त्यानुसार २०२५-२६ करिता शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील सुमारे ३६ गावातील ८३ साठवण बंधारे पाझर तलाव, को प बंधारे, सि.ना. बंधारे यामधील गाळ काढण्याच्या कामाकरिता ४ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आले आहे.



शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या नियंत्रणाखाली शासन निधी तसेच सार्वजनिक व खाजगी भागीदारी व अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर व सनियंत्रणात हे काम होणार आहे. याद्वारे तलावांमधील काढलेला गाळ (सुपीक माती) शेतकऱ्यांना शेतामध्ये पसरून शेत जमीन सुपीक करता येणार आहे. याकरिता स्थानिक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन या योजनेचा लाभ घेण्याचे ही आवाहन करण्यात आले आहे.

मतदारसंघातील शेवगाव तालुक्यातील गोळेगाव, लाडजळगाव, प्रभूवाडगाव, बेलगाव, ढोरजळगाव-ने, बोधेगाव, ठाकूर पिंपळगाव, चापडगाव, माळेगाव, मुरमी, हसनापुर, राक्षी, वरूर खुर्द, भगुर, सालवडगाव तर पाथर्डी तालुक्यातील करोडी, जिरेवाडी, जवखेडे खालसा, भिलवडे, येळी, खरवंडी कासार, मोहटे, हत्राळ, निपाणी जळगाव, चिंचपुर इजदे, सांगवी, चितळी, तीनखडी, मढी, जवखेडे दुमाला, कोरडगाव, पिंपळगाव टप्पा इत्यादी गावातील ८३ बंधारे, पाझर तलावातील गाळ काढण्यासाठीच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली असून अशासकीय संस्थाचे ठरावानुसार त्यांना काम वाटप करण्यास मान्यता दिली असल्याचे आमदार मोनिका राजळे यांनी सांगितले.

> शासनाच्या गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेचा शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा. तलाव, बंधारे गाळमुक्त झाल्यामुळे तलावाची साठवण क्षमता वाढेल व पाणी पाझरणे प्रमाण वाढेल यामुळे हजारो हेक्टर शेती सिंचनाचा फायदा होणारा असून भूगर्भातील पाणी पातळी वाढणार आहे व जमिनीची सुपीकता होईल.
>
> **– आ. मोनिका राजळे,**
> विधानसभा सदस्य.

## अकोले नगरपंचायत मुख्याधिकारीपदाचा पदभार धनश्री पवार यांनी स्विकारला




**● अकोले । वीरभूमी–**
अकोले नगरपंचायतीच्या मुख्याधिकारीपदी धनश्री पवार यांनी शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ रोजी कार्यभार स्वीकारला असून त्यांचे अकोले नगरपंचायतीच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी अकोले नगरपंचायतीचे नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, उपनगराध्यक्ष शरद नवले, नगरसेवक सागर चौधरी, शितल वैद्य, प्रतिभा मनकर, आरिफ शेख, नवनाथ शेटे, विजय पवार, परशराम शेळके, नवनाथ मोहिते, मोहसीन शेख, प्रमोद मंडलिक, उबेद शेख तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

धनश्री पवार यांनी अकोले शहरात मोठ्या प्रमाणात काम करण्यास वाव असून स्वच्छता मोहीम, पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी नळ योजना राबविणे, प्लास्टिक बंदी तसेच विविध विकास कामांचे नियोजन करून ते मार्गी लावण्याचे ध्येय समोर ठेऊन काम करेल असे सर्व सदस्य यांना आश्वस्त केले.

मुख्याधिकारी पदावर रुजू होण्यापूर्वी धनश्री पवार यांनी अकोला महानगरपालिका याठिकाणी सहा. आयुक्तपदी काम पाहिलेले आहे.

## संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या दहा अभियंत्यांची डेलॉइट कंपनीमध्ये नोकरीसाठी निवड



**● कोपरगाव । वीरभूमी–**
संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या प्रयत्नाने डेलॉइट या लंडनमध्ये मुख्यालय असलेल्या कंपनीचा कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. या कंपनीच्या मानव संसाधन विभागाच्या प्रतिनिधिंनी घेतलेल्या मुलाखतींमध्येसंजीवनीइंजिनिअरींग कॉलेजच्या इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी व इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या अंतिम सत्रातील एकुण दहा नवोदित अभियंत्यांना चांगले वार्षिक पॅकेज देवु करून नोकरीसाठी निवड केली आहे. अशा प्रकारे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या नियोजनबध्दतेमुळे अनेकांचे नोकरदार होण्याचे स्वप्न पुर्णत्वास जात आहे, अशी माहिती महाविद्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, डेलॉइट कंपनीने इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विभागाच्या सौरव संजय डोंगरे, प्रतिक सचिन जाधव, श्रध्दा कैलास जेजुरकर, साईप्रसाद भरत मोरे, यश संजय मुसमाडे, अथर्व हेमंत पुरी, प्रदिप राजेंद्र वरखडे, संस्कृती विनायक जावळे, श्रुती लक्ष्मण खडांगळे व इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या तृप्ती शिवाजी मगर यांची नोकरीसाठी निवड केली आहे.

ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग व संबधित अभियांत्रिकी शाखेचा विभाग यांच्या परस्पर पुरक समन्वयातुन कोणत्या कंपनीला कोणत्या प्रकारचे विद्यार्थ्यांकडून आधुनिक तंत्रज्ञान अपेक्षित आहे, याचा साकल्याने अभ्यास केला जातो व त्या तंत्रज्ञानाचा एकतर अभ्यासक्रमात समावेश केला जातो किंवा अधिकचे शिकविल्या जाते. तसेच मुलाखतींचा सराव करून घेतला जातो. यासर्व बाबींमुळे संजीवनीचे विद्यार्थी वेगवेगळ्याा बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरीसाठी सहज निवडले जातात आणि आई वडीलांनी जे स्वप्न डोळ्यात साठवुन ठेवेलेले असते, ते सहज पुर्ण होत, असे पत्रकात शेवटी म्हटले आहे.

संजीवनीचे अध्यक्ष श्री नितिनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी श्री अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या अभियंत्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शेडगावचे ग्रामदैवत भैरवनाथ महाराज यात्रोत्सव जल्लोषात

### अखेरची निकाली कुस्ती महाराष्ट्र केसरी पै. बाला रफीक शेख आणि भारत केसरी पै. माऊली जमदाडे यांच्यात झाली

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
शेडगाव गावचे ग्रामदैवत भैरवनाथ महाराज यात्रा उत्सव २३ व २४ एप्रिल रोजी उत्साहात पारंपारिक आणि सांस्कृतिक पद्धतीने संपन्न झाला. २३ एप्रिलला यात्रा उत्सवाला सुरवात झाली होती. यावेळ हजारो भाविकांनी भैरवनाथ महाराजांचे दर्शन घेऊन दंडवत घेतले, अभिषेक केला, गावातील अनेकांनी वाजतगाजत शेरनी काढत प्रसाद वाटला.अनेकांनी नवसपूर्ती केली. सायं. ६ वा. पारंपारिक गाडे ओढून रंगत आणली तर आधुनिक आणि पारंपारिक वारसा जपत शेडगाव ग्रामस्थांच्या गजे पथकाने सर्वांची मने जिंकली. ८ वाजता शोभेच्या दारूत पालखी मिरवणूक निघाली.



दुसऱ्या दिवशी मा. सरपंच विजय शेंडे, उपसरपंच विलास रणशिंग, पै. महेंद्र रणशिंग, पै. विजय रसाळ, लक्ष्मण रसाळ, भाऊसाहेब गवळी, भिमराव बेल्हेकर, शांताराम गोरे, राजेंद्र शेंडे, किसन बेल्हेकर, झुंबर जांभळे, आप्पा शेंडे, विजय लिंबाजी रसाळ, बिंटू भुजबळ, शाहूराज भोपळे, मा उपसरपंच अजय धेंडे, धनराज भोपळे, बिभीषण राऊत, संजय भुजबळ, यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या मार्गदर्शनाखाली निकाली कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. पंच म्हणून पै. बाळासाहेब कुदळे, पै. बजीरंग भदे, पै. विष्णू भोपळे, पै. महेंद्र रणशिंग, पै. विजय रसाळ यांनी काम पाहिले तर कुस्ती निवेदक म्हणून युवराज सोलंकर यांनी काम पाहिले. पै. तुषार सोनवणे विरुद्ध पै. पृथ्वीराज खेंडके यांच्यात ५१ हजार रुपयांची कुस्ती झाली, दुसरी कुस्ती ७७ हजार ७७७ रुपयांची पै. विजय पवार विरुद्ध पै. मोईन पटेल यांच्यात झाली तर शेवटची कुस्ती १ लाख रुपयांची पै. बाला रफिक शेख विरुद्ध पै. माऊली जमदाडे यांच्यात झालेल्या अटीतटीच्या कुस्तीने प्रेक्षकांचे मन जिंकले.

## भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलला मुख्यमंत्री स्वच्छ शाळा... सुंदर शाळेत प्रथम क्रमांक

**● नगर । वीरभूमी–**
नगर तालुक्यात व शहरी भागात मिळून एकाच गटात झालेल्या चुरशीच्या मुख्यमंत्री स्वच्छ शाळा ,सुंदर शाळा स्पर्धेत अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलने प्रथम क्रमांक पटकाविला. शाळेला यानिमित्ताने प्रथम क्रमांकाचे तीन लाख रुपयांचे बक्षिस नुकतेच प्राप्त झाले आहे.

या स्पर्धेत शाळांना विविध निकष पूर्ण करण्यासाठी जवळपास १५० गुणांचे मूल्यांकन होते. यामध्ये ठळकपणे शाळेतील अद्ययावत भौतिक सुविधांसह शैक्षणिक गुणवत्ता, सुसज्ज ग्रंथालय, प्रयोगशाळा, स्कॉलरशिप सारख्या स्पर्धा परीक्षेतील यश, दहावी-बारावी निकाल सोबतच पर्यावरण संवर्धनात पावसाच्या पाण्याचे संवर्धन, कचरा पुनर्वापर, सोलर वापर, परसबाग, ऐतिहासिक वारसा संवर्धन, कला, क्रीडा, सांस्कृतिक योगदान, शालेय परिसराची सजावट, विद्यार्थी पालक यांचा कृतिशील सहभाग यासह अनेक बाबींचा समावेश होता.

या यशातील कौतुकास्पद बाब म्हणजे यामध्ये नगर शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व शाळा व सोबतच नगर तालुक्यातील सर्व शाळा मिळून एकच गट होता. मिळालेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अभय फिरोदिया, उपाध्यक्ष अशोकजी मुथा, प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, विश्वस्त सुनंदाताई भालेराव, ॲड. गौरव मिरीकर, सल्लागार समितीचे सदस्य भूषण भंडारी, हेमंत मुथा यांनी विद्यालयाचे प्राचार्य उल्हास दुगड, उपप्राचार्य पोपटराव पवार, पर्यवेक्षक बाळासाहेब वाव्हळ, विष्णू गिरी, कैलास साबळे यांसह सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

या यशामुळे सर्व स्तरातून शाळेचे अभिनंदन होत असून, विद्यार्थी, पालक व अध्यापकांमध्ये आनंद आणि उत्साह संचारला आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## आबासाहेब सोनवणे यांचा महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरव

**● नगर । वीरभूमी-**

हिंगणगाव (ता. नगर) येथील लोकनियुक्त सरपंच तथा सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे राज्य कोअर कमिटी अध्यक्ष आबासाहेब सोनवणे पाटील यांचा युवा महाराष्ट्र फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्र भूषण सन्मान पुरस्कार २०२५ ने गौरव करण्यात आला. ग्रामीण भागात कायापालट करण्याच्या उद्देशाने केलेल्या विविध कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. पुणे, शिवाजीनगर येथील पंडित जवाहरलाल सभागृहात सिने अभिनेत्री साराह मोतीवाला यांच्या हस्ते सोनवणे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सन्मान सोहळ्यासाठी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. अविनाश सकुंडे, संस्थेचे राज्य सचिव गणेश विटकर, उद्योजक एस.एस. सावंत आदी मान्यवर उपस्थित होते. आबासाहेब सोनवणे यांचे वडील नगरपंचायत समिती माजी उपसभापती तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक कै. भास्करराव पाटील सोनवणे यांनी ३५ वर्ष सरपंचपद भूषविले. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून आबासाहेब सोनवणे गावाच्या विकासासाठी सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. मागील २५ वर्षात अथकपणे केलेल्या जपसंधारणाच्या कामामुळे दुष्काळी गावाची ओळख पुसून त्यांनी गाव पाणीदार केले आहे. हिंगणगावमध्ये ११ बंधारे बांधून नदीचे ९ किलोमीटर पर्यंत खोलीकरण केले आहे. कुरणमळा या ठिकाणी नदीजोड प्रकल्प राबवून शिवारातील वाहून जाणारे पाणी एकत्रित करून बंदपाईपद्वारे बंधाऱ्यात सोडले आहे. जलयुक्त शिवार योजनेचे काम त्यांनी गावात सक्षमपणे राबविले. नदी व बंधारे गाळमुक्त करून पाणीदार गावाचे स्वप्न यशस्वीपणे पूर्ण केले. स्मशानभूमीचे नूतनीकरण, झाडांची लागवड, रस्ते मजबुतीकरण, डांबरीकरण, शाळा व अंगणवाड्यांसह गावातील विविध मुलभूत प्रश्न सोडवून गावाच्या विकासासाठी त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. रयत शिक्षण संस्थेवर ३० वर्षापासून सदस्य म्हणून काम करत आहे. गावाबरोबर तालुक्यातील सरपंच, उपसरपंच यांना एकत्रित करून सरपंच परिषदेच्या तालुका अध्यक्ष म्हणून कामाला सुरुवात केली. शासन दरबारी अनेक प्रश्न मांडून त्याची सोडवणूक केली. त्याच माध्यमातून ते महाराष्ट्र राज्य सरपंच परिषदेचे राज्य अध्यक्ष म्हणून धुरा सांभाळत आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रतिष्ठेचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर त्यांना नाशिक येथील ब्लू स्टार इव्हेंटचा राष्ट्रीय दिव्य प्रतिभा पुरस्कार सुद्धा प्राप्त झालेला आहे. पुरस्कार स्वीकारण्यासाठी सौ. स्मिता सोनवणे, घोडगंगा कारखान्याचे संचालक कैलास पाटील सोनवणे, नाबार्ड बँकेचे बबनराव सोनवणे, उद्योजक अमोल सोनवणे, संतोष सोनवणे, ट्रान्सपोर्ट व्यावसायिक जयंतराव नलावडे, सामाजिक कार्यकर्ते निसार पठाण उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्याबद्दल सोनवणे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## शिक्षिका हिराबाई बढे यांचे निधन

**● नगर । वीरभूमी-**



संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथील रहिवासी आणि विद्यार्थ्यांच्या मनात अढळ स्थान मिळवणाऱ्या शिक्षिका सौ. हिराबाई रामराव बढे (वय ६९ वर्षे) यांचे नुकतेच निधन झाले.शिक्षण क्षेत्रात त्यांनी आपले आयुष्य समर्पित केले. त्यांनी जनता विद्यालय- वडगाव पान, सह्याद्री विद्यालय- अंभोरे, संगमनेर खुर्द, तसेच साकुर येथील शाळांमध्ये शिक्षिका म्हणून कार्य केले. विद्यार्थीप्रिय शिक्षिका म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या पश्चात पती रामराव राधूजी बढे, मुलगा डॉ. उदयकुमार बढे (न्यूरोसर्जन), सून डॉ. कावेरी बढे (रेडियोलॉजिस्ट), मुलगी उर्मिला रमेश घोटेकर (ग्रामविस्तार अधिकारी), नातू कियांश उदयकुमार बढे असा परिवार आहे.

# जैन तत्वज्ञान सकल मानवजातीच्या कल्याणाची शिकवण देते

### उपाध्यक्ष प्रवीणऋषीजी म. सा. | चिचोंडी येथे अर्हम् विज्जा केंद्रिय ज्ञानकेंद्र निर्मितीचा भुमी शुध्दीकरण सोहळा

**● पाथर्डी । वीरभूमी-**



जैन तत्वज्ञान हे सकल मानवजातीच्या कल्याणाची शिकवण देते. मानवता, अनेकांतवाद, अहिंसा, अपरिग्रह हे विचारच जगाला शांततेचा मार्ग दाखवू शकतात. जैन सिद्धांत, तत्वज्ञान व जैन आगमातील अभ्यास यासाठी जागतिक कीर्तीचे जैन विद्यापीठ समकक्ष ज्ञानकेंद्र चिचोंडी येथे निर्माण करून त्याद्वारे प्रशिक्षक निर्मिती व प्रशिक्षण केंद्र चालविले जाईल, असे प्रतिपादन अर्हम विज्जा प्रणेता उपाध्याय प्रविणऋषीजी म.सा. यांनी केले.

आचार्य सम्राट श्री आनंदऋषीजी यांचे सुशिष्य अर्हम् विज्जा प्रणेता पूज्य प्रविणऋषीजी म. सा. यांच्या प्रेरणा आणि संकल्पनेतुन साकार होत असलेल्या अर्हम् विज्जा केंद्रिय ज्ञानकेंद्र निर्मितीचा भुमी शुध्दीकरण सोहळा जैन विधीनुसार आचार्य भगवंत यांची जन्मभुमी चिचोंडी (ता. पाथर्डी) येथे उत्साहात संपन्न झाला.

महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण व क्रीडा मंत्री राजेंद्र दर्डा, संभाजीनगर महासंघ चातुर्मास समितीचे अध्यक्ष पंकज फुलफगर यांच्या हस्ते हा भुमीपुजन सोहळा पार पडला. या विषयी अधिक माहिती देताना पूज्य प्रविणऋषीजी म्हणाले की, सर्व समाजाच्या उत्थानासाठी समर्पित भावनेने कार्य होणे आवश्यक आहे. ही समर्पित भावना मनात निर्माण होणे म्हणजेच संयमी जीवन धारण करण्याचाच मार्ग आहे. त्यासाठी सर्वोपरी त्याग करण्याची गरज नसुन फक्त मनात समभाव निर्माण करणे गरजेचे आहे. अर्हम् विज्जाचे प्रशिक्षक आणि साधकांचे मोठे जाळे संपुर्ण देशात व विदेशात पसरले असुन हजारो प्रशिक्षकांच्या माध्यमातून सर्व समाजाच्या नैतिक मुल्यांकन वृध्दी आणि आदर्श जीवनप्रणालीचे सुत्र वाचन व ध्यान साधनेच्या माध्यमातून केले जात असुन गर्भ संस्कारापासुन जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंतची साधना व आराधना अर्हम् विज्जाच्या माध्यमातून शिकविले जाते. हजारो समर्पित प्रशिक्षक आणि लाखो साधकाच्या सोयीसाठी श्रीगुरु आनंद फाऊंडेशन चिचोंडीच्या माध्यमातून हे भव्य अर्हम् विज्जा सेंटर ज्ञानतीर्थ उभे राहणार आहे. चिचोंडी येथे सुमारे ७० एकर जागेत आगामी काळात आनंदतीर्थासह विविध प्रकल्प कार्यान्वित होणार आहेत. यावेळी माजी मंत्री राजेंद्र दर्डा यांनी या उपक्रमास शुभेच्छा देत सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

या कार्यक्रमास तिर्थेशऋषिजी म. सा., युवा तपस्वी प. पू. मुकेशमुनीजी म. सा., महासती सुनंदाजी म. सा., महासती शुभदाजी म. सा., महासती सुविज्ञाजी, महासती आदर्शज्योतीजी, महासती ओजसदर्शनाजी आदी साधु साध्वीजींचे आशिर्वाद व सानिध्य लाभले.

या ठिकाणी उभ्या राहणाऱ्या वास्तुमध्ये कुठल्याही जीवाची आशातना होऊ नये अशी मंगल प्रार्थना व क्षमापना ही यावेळी सामुहिकपणे करण्यात आली.

यावेळी गुरु आनंद फाऊंडेशन व अर्हम् विज्जाचे पदाधिकारी अर्हम विज्जाचे साधक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कमलेश गुगळे, आनंद गुगळे, अमोल पटवा, संजय गुगळे, माया धोका आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## युपीएससी परीक्षेत यश मिळवल्याबद्दल सागर मुखेकर यांचा कोरडगाव ग्रामपंचायतीच्यावतीने सत्कार

**● पाथर्डी । वीरभूमी-**



नुकत्याच निकाल लागलेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत तालुक्यातील कोरडगाव येथील सागर बबनराव मुखेकर यांची निवड झाली. या जाहीर झालेल्या उत्तीर्ण यादीत मुखेकर यांनी ७०७ रँक मिळवत दैदिप्यमान यश मिळवले. हा निकाल जाहीर होताच कोरडगाव येथे आनंदोत्सव साजरा झाला. या दैदिप्यमान यशाबद्दल कोरडगाव ग्रामपंचायतीच्या व ग्रामस्थांच्या वतीने मुखेकर यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी सरपंच रवींद्र उर्फ भोरु म्हस्के, उपसरपंच अरुण मुखेकर, नागनाथ वाळके, काकासाहेब देशमुख, ग्रा.पं. सदस्य समीर बागवान, नाना जाधव, अक्षय मुखेकर, रामभाऊ मुखेकर, अतुल गोरे, अण्णा कुसळकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बोलताना म्हस्के म्हणाले की, सागर यांचा संघर्ष अनेकांनी अतिशय जवळून पाहिला आहे. या संघर्षावर चिकाटीने मेहनत करून व त्याला शिस्त आणि प्रामाणिकपणा यांची जोड देऊन आपण सहज मात केली व युपीएससी सारख्या खडतर प्रवासामध्ये यश मिळवले हे पाहून गावातील प्रत्येक नागरिकाला अतिशय आनंद झाला. तुमचे हे यश अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. या यशाने आपण कोरडगावच नाहीतर तालुका व जिल्ह्याचे भुषण ठरला आहात. ग्रामीण भागातील विद्यार्थी ही आपल्या मेहनतीच्या व चिकाटीच्या जोरावर यश मिळवू शकतो हे आपण दाखवून दिले आहे.

यावेळी बोलताना मुखेकर म्हणाले की, या यशानंतर अनेक मित्रांनी सहकाऱ्यांनी नातेवाईकांनी अधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. परंतु आपल्या मातृभूमीतील लोकांनी केलेले अभिनंदन व कौतुक हे अविस्मरणीय आहे. या स्पर्धा परीक्षांच्या युगात अपयशाला न डगमगता अपयशाने न खचता जिद्द व सातत्य राखले तर यश नक्कीच मिळते. अनेकदा अपयश मिळाले परंतु नाउमेद झालो नाही. परंतु यशाला गवसणी घातल्यानंतर मोठा आनंद झाला या आनंदात मेहनती बरोबर अनेकांच्या शुभेच्छा, आशिर्वाद कामी आले.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर विवेक कोल्हे यांचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय

**● कोपरगाव । वीरभूमी-**



काश्मीरमधील निसर्गरम्य आणि शांततामय पहलगाम येथे नुकत्याच घडलेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात अनेक निष्पाप पर्यटक नागरिकांनी आपले प्राण गमावले. देश दुःखात असताना या पार्श्वभूमीवर २७ एप्रिल रोजी आपला वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय सहकार महर्षी शंकरराव कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी घेतला आहे.

देशातील विविध राज्यांमधून पर्यटनासाठी आलेल्या नागरिकांना टार्गेट करत करण्यात आलेला हा कायरतापूर्ण हल्ला केवळ अमानुष नव्हे, तर मानवी मूल्यांनाही काळिमा फासणारा आहे.या हल्ल्यामुळे संपूर्ण देशभरात शोककळा पसरली असून नागरिकांच्या मनात तीव्र वेदना आणि दुःख आहे. या पार्श्वभूमीवर विवेकभैय्या कोल्हे यांनी एक भावनिक आणि सुसंवेदनशील निर्णय घेतला आहे. या हल्ल्यात प्राण गेलेल्या देश बांधवांप्रति श्रद्धांजली त्यांनी व्यक्त केली आहे.

२७ एप्रिल हा त्यांचा वाढदिवस असून दरवर्षी या दिवशी युवक, कार्यकर्ते, सहकारी, उद्योजक, शेतकरी बांधव आणि हितचिंतक मोठ्या उत्साहाने शुभेच्छा देतात. मात्र यंदा, देशावर आलेल्या या दुःखद प्रसंगामुळे त्यांनी हा निर्णय घेतला आहे. या दिवशी कोणताही सार्वजनिक आंदोत्सव कार्यक्रम, स्वागत समारंभ किंवा जल्लोष केला जाणार नाही. तसेच हार, बुके, केक किंवा फ्लेक्सच्या स्वरूपातील शुभेच्छा कुणीही देऊ नयेत असेही आवाहन केले आहे.

त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, जेव्हा देश शोकसागरात आहे, तेव्हा वैयक्तिक आनंद साजरेपणाला थांबवणे ही आपली नैतिक जबाबदारी असते. तुमचा आशीर्वाद आणि साथ ती नेहमी माझ्यासोबत राहिली आहे आणि पुढेही राहो, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

# खेळ व व्यायाम या शरीरासाठी चांगल्या मेजवान्या

### प्राचार्य अरुण वावरे | चापडगाव विद्यालयात कला व क्रीडा उद्बोधन शिबिराचे उद्घाटन

**● शेवगाव । वीरभूमी-**



विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रत्येक शालेय उपक्रमामध्ये सहभाग नोंदवावा. त्यातीलच क्रीडा - कला उपक्रम सर्वोत्तमच असे प्रतिपादन प्राचार्य अरुण वावरे यांनी केले.

खेळामुळे शरीर संपदा फुलते व आयुष्यभरासाठी शिदोरी म्हणून कामी येते. आयुष्य यशस्वी घडवायचे असेल तर खेळ व व्यायाम ही मोठी मेजवानी आहे. कित्येक नामांकित खेळाडू ग्रामीण भागातील असून सुध्दा खेळात व स्पर्धेत यशस्वी होवून आज उच्चपदस्थ आहेत. तेव्हा हे शिबिर संस्थेने आपल्याला एक पर्वणी उपलब्ध करून दिली आहे, त्याचा आपण पुरेपूर लाभ घ्या, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

चापडगाव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात कला व क्रीडा उद्बोधन शिबिर वर्गाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी ते अध्यक्षस्थानाहून बोलत होते. कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर पर्यवेक्षक लक्ष्मण गाडे, आप्पासाहेब ढगे, प्रा. अनिल जगताप, वत्सला जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

शिक्षक प्रतिनिधी म्हणून आप्पासाहेब ढगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या शिबिरामध्ये एकूण २०० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. दहा दिवस सकाळ - सायंकाळ चालणाऱ्या या कला क्रीडा व उदबोधन वर्गात प्रार्थना, मनोरंजक खेळ, कला, कौशल्य, गायन, वादन, नृत्य, पारंपारिक खेळ, लेझीम, क्रिकेट, खो-खो, कुस्ती, कबड्डी इत्यादी उपक्रम ज्ञानेश्वर तहकीक, सादिक शेख, संभाजी टाकळकर, शरद जाधव, मंजाराम रासनकर यांच्या मार्गदर्शनाखाली रोज संपन्न होणार आहे. विशेष म्हणजे दररोज एका शिक्षकांच्या वतीने शिबिरार्थिंना अल्पोपहार व फलाहाराची सुध्दा व्यवस्था करण्यात आलेली आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संभाजी टाकळकर यांनी केले तर शितल दहिवाळकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंदांचे सहकार्य लाभले.

## महाराष्ट्राच्या कणाकणात भक्तीचे अस्तित्व : महामंडलेश्वर आशुतोषानंद महाराज

**● कोपरगाव । वीरभूमी-**



ज्याप्रमाणे भगवान शंकर काशीच्या प्रत्येक कणात उपस्थित आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या कणाकणात भक्ती अस्तित्वात असल्याचे प्रतिपादन काशीच्या कैलास आश्रमाचे महामंडलेश्वर आशुतोषानंद महाराज यांनी केले आहे.

राहाता तालुक्यातील श्री क्षेत्र शिंगवे येथे श्री हरिहरेश्वर मंदिरात मूर्ती प्रतिष्ठापना उत्सव आयोजित केला आहे. त्यावेळी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राला संतांची भूमी म्हटले जाते. येथे अनेक महान संतांचा जन्म झाला आणि त्यांनी त्यांच्या शिकवणीतून समाजाला भक्ती, प्रेम, समानता आणि एकतेचा मार्ग दाखवला.

जर तुम्ही ज्ञानी झालात तर तुम्ही नम्र व्हाल. ज्याप्रमाणे फळझाडे नतमस्तक होतात, त्याचप्रमाणे ज्ञानी लोकही नतमस्तक होतात. संत नामदेव, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत जनाबाई, संत एकनाथ, या सर्वांचे आपल्यावर खूप उपकार आहेत. वेद, पुराणे आणि धर्मग्रंथ काय सांगतात ते तुम्ही वाचू शकत नाही. त्याला तुमच्या भाषेत अभंगाच्या स्वरूपात तयार करून देणे ही संतांची मोठी कृपा आहे. येथे जातीभेद नाही, उच्च-नीच भेद नाही, वर्ण भेद नाही. प्रत्येकाला भक्ती करण्याचा अधिकार आहे असे सांगितले.

यावेळी नवनाथ महाराज म्हस्के यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. याप्रसंगी आचार्य ऋषिकेश महाराज, आचार्य भगवान महाराज शास्त्री, साई सुरेशानंद भारती, गणेश महाराज शास्त्री, शिवाजी म. ठाकरे, नामदेव म. तळेकर, रामभाऊ म.चौधरी, शुभम म. काशीद, ज्ञानेश्वर म. गुंजाळ, वसंत म. भाकरे आदिंसह रास्तापूर, पिंपळवाडी, भोजडे, वारी, सडे शिंगवे, कान्हेगाव, कोपरगाव आदी गावातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमृतवाहिनी स्कूलच्या ऋषिकेश गायकवाडची यूपीएससी मध्ये भरारी

## अमृतवाहिनी संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयूताई देशमुख यांच्या हस्ते गायकवाड यांचा सत्कार

**● संगमनेर । वीरभूमी–**

माजी शिक्षण मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्तापूर्ण शिक्षण असणाऱ्या अमृतवाहिनी मॉडेल स्कूल चा माजी विद्यार्थी ऋषिकेश राजेंद्र गायकवाड यांनी यूपीएससी परीक्षेमध्ये घवघवीत यश मिळवले असून अमृतवाहिनीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

अमृतवाहिनी मॉडेल स्कूल हे गुणवत्तापूर्ण इंग्रजी शिक्षणाचे केंद्र आहे. या स्कूलचे अनेक विद्यार्थी देशात व परदेशात विविध मोठ्या पदांवर काम करत आहे तसेच अनेक विद्यार्थी हे प्रशासकीय सेवेमध्ये आपली सेवा देत आहे. अमृतवाहिनी मॉडेल स्कूलचा माजी विद्यार्थी असलेला व आश्वी बुद्रुक येथील रहिवासी असलेल्या ऋषिकेश राजेंद्र गायकवाड यांनी यूपीएससी परीक्षेत देशात ६१० क्रमांक मिळवला आहे. हे यश संस्थेसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे म्हणून ऋषिकेश गायकवाड याचा अमृतवाहिनी संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयूताई देशमुख यांनी सत्कार केला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, स्कूलच्या प्रभारी प्राचार्य श्रीमती शोभा हजारे, डॉ. जे. बी. गुरव, डॉ. एम. ए. वेंकटेश, डॉ. मनोज शिरभाते, डॉ. राजेंद्र वाघ, डॉ. बाबासाहेब लोंढे, डॉ.मच्छिंद्र चव्हाण, विलास भाटे आदींसह अमृतवाहिनी मॉडेल स्कूलचे शिक्षक विविध प्राचार्य उपस्थित होते.

यावेळी बोलताना शरयूताई देशमुख म्हणाल्या की, अमृतवाहिनी संस्थेतील अनेक विद्यार्थ्यांनी एमपीएससी व यूपीएससीच्या परीक्षेमध्ये मोठे यश मिळवले असून हे संस्थेसाठी अभिमानास्पद आहे. त्याचप्रमाणे संस्थेतील इतर विभागांमधील अनेक विद्यार्थी देशात व परदेशात मोठ्या पदांवर चांगल्या पॅकेजवर कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये आनंद निर्माण झाल्याने त्यांचे कुटुंब समृद्ध होते आणि याचा कायम अभिमान संस्थेला आहे.

ऋषिकेश गायकवाड म्हणाला की २०१२-१३ या शैक्षणिक वर्षांमध्ये मी अमृतवाहिनी मॉडेल स्कूल मधून शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालो. प्रशासकीय सेवेत जाण्याची इच्छा मॉडेल स्कूल मधूनच निर्माण झाली यासाठी माझ्या शिक्षकांनी मला सातत्याने प्रेरणा दिली. ग्रामीण भागात असूनही इंग्रजी आणि इतर ज्ञान सातत्याने मिळवत गेल्याने मलाही यश मिळाले. यामध्ये संस्थेचा आई-वडिलांचा मोठा वाटा असल्याचे ते म्हणाले. यापूर्वी हितेश राजपाल, दीपिका तांगडकर, परवेश




शेख यांनीदेखील यूपीएससी परीक्षेमध्ये घवघवीत यश प्राप्त केले आहे.

ऋषिकेश गायकवाड यांच्या यशाबद्दल माजी शिक्षण मंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष लोकनेते बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, कार्यकारी विश्वस्थ सौ. शरयूताई देशमुख, बाळासाहेब पाटील गुंजाळ, सौ. दुर्गाताई तांबे, आमदार सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

# ...तर मी स्वत: वाळूच्या गाड्या पेटवून देईल

## आ. आशुतोष काळेंनी पुकारला अवैध वाळू तस्करी विरोधात एल्गार

**● कोपरगाव । वीरभूमी–**



अवैध वाळू तस्करीबाबत असंख्य नागरिकांच्या तक्रारी आहेत. नियम धाब्यावर बसवून प्रचंड प्रमाणात वाळू तस्करी होत आहे. याबाबत अनेकवेळा महसूल आणि पोलीस प्रशासनाला सूचना केल्या परंतु त्यांच्याकडून सोयीस्करपणे दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे आपला संयम आता संपला आहे. वेळप्रसंगी कायदा हातात घेवून मी स्वत: वाळूच्या गाड्या पेटवून देईल असा ईशारा देत आ.आशुतोष काळे यांनी अवैध वाळू तस्करीविरोधात एल्गार पुकारला आहे.

कोपरगाव तालुक्यात सुरु असलेल्या अवैध वाळू व्यवसायाबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर आ. आशुतोष काळे यांनी आपली रोखठोक प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी त्यांनी सांगितले की, शासकीय वाळू लिलावातून शासनाला महसूल मिळतो हे मान्य आहे. परंतु हा वाळू उपसा करीत असतांना त्यासाठी महसूल व पर्यावरण विभागाने काही नियम घालून दिलेले आहेत.मात्र हे नियम धाब्यावर बसवून प्रचंड वाळू उपसा केला जात असून शासकीय वाळू लिलावाबरोबरच अवैध वाळू व्यवसाय देखील मोठ्या प्रमाणात सुरु आहे. वाळूच्या अवजड वाहनांमुळे रस्त्याची तर वाट लागलीच आहे. परंतु स्व.कर्मवीर शंकररावजी काळे साहेब यांच्या सहकार्यातून व माजी आमदार अशोकराव काळे यांच्या अथक प्रयत्नातून उभ्या राहीलेल्या ज्या धारणगाव-कुंभारी पुलाने कोपरगाव शहराची बाजारपेठ फुलविण्यास मदत केली त्या पुलाच्या पायाजवळून दिवसा ढवळ्या सुरु असलेला वाळू उपसा महसूल आणि पोलीस प्रशासन उघड्या डोळ्यांनी पाहत आहे हि चीड आणणारी बाब आहे. जर या पुलाच्या पायाजवळ सुरु असलेल्या वाळू उपश्यामुळे पुलाला काही धोका झाला तर काय परिणाम होवू शकतात याचे किंचितही गांभीर्य महसूल आणि पोलीस प्रशासनाला नाही.त्याबाबत अनेकवेळा महसूल आणि पोलीस प्रशासनाला सूचना केल्या परंतु त्यांच्याकडून हा वाळू उपसा थांबविला गेला नाही. त्यामुळे मी स्वत: याबाबत पुढाकार घेत असल्याचे सांगत मला कायदा हातात घ्यावा लागेल असे संकेत देत मी स्वत: वाळूच्या गाड्या पेटवून देईल असा गर्भित ईशारा त्यांनी दिला आहे.

कोपरगाव तालुक्याला मोठ्या प्रमाणात गोदावरी नदीचे विस्तीर्ण पात्र लाभले असून या पात्रात मोठ्या प्रमाणात वाळू साठा असल्यामुळे महसूल आणि पोलीस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कोपरगाव तालुक्यासह बाहेरील तालुक्यातून वाळू तस्करांनी कोपरगाव तालुक्यात आपले बस्तान बसविले आहे. या वाळू तस्करांची मुजोरी एवढी वाढली आहे की, प्रशासनाचा वरदहस्त पाठीशी असल्यामुळे हे वाळू तस्कर कुणालाही जुमानत नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरीक देखील या वाळू तस्करांच्या दहशतीखाली असल्यामुळे गोदावरी नदीतील कित्येक शेतकऱ्यांच्या पाईप लाईनचे नुकसान होवून देखील शेतकरी हा त्रास मुकाट्याने सहन करीत आहेत. परंतु या अवैध वाळू तस्करी विरोधात आ. आशुतोष काळे यांनीच आक्रमक पवित्रा घेतल्यामुळे मतदार संघातील नागरिकांनी त्यांच्या या आक्रमक भूमिकेचे स्वागत केले आहे.

# बुद्धिबळ मनाची एकाग्रता विकसीत करण्यासाठी अत्यंत आवश्यक : सौरभ ढाकणे

**● पाथर्डी । वीरभूमी–**

बुद्धिबळ हा खेळ मानवी मनाची एकाग्रता वाढवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे अभ्यासातील गती देखील वाढू शकते व आपल्या भावी आयुष्यात आपल्या सर्वांगीण विकासासाठी याचा अत्यंत फायदा होऊ शकतो असे प्रतिपादन सौरभ ढाकणे यांनी व्यक्त केले.

आनंद चेस क्लब व श्री तिलोक जैन विद्यालय, पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य सायमल बुद्धिबळ स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. नुकत्याच लागलेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या निकालात त्यांनी राष्ट्रीय स्तरावर ६२८ क्रमांकाची रँक मिळवलेली आहे. त्या निमित्ताने त्यांचा सत्कार या कार्यक्रमावेळी आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य अशोक दौंड, यशवंत बापट, डॉ. विनय कुचेरिया, डॉ. शिरीष



जोशी, प्रज्वल आव्हाड, आतिश भावसार, भारत गाडेकर, सागर नलवडे, सचिन ढाकणे, महादेव खोटे या सह विविध मान्यवर उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना बुद्धिबळ खेळामध्ये आवड निर्माण होण्यासाठी आनंद चेस क्लब व श्री तिलोक जैन विद्यालयाच्या माध्यमातून नेहमीच सतत वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात त्या अनुषंगाने बुद्धिबळामध्ये राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे नेतृत्व करणारा विद्यार्थी प्रज्वल आव्हाड या बरोबर १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना बुद्धिबळ खेळण्याची संधी या सायमल बुद्धिबळ स्पर्धेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्याबद्दल सर्वच मान्यवरांनी विशेष कौतुक केले. यावेळी यशवंत बापट म्हणाले, प्रज्वल आव्हाड या बुद्धिबळपटूने अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत पाथर्डीचे नाव देश पातळीवर गाजवले. शिवाय भविष्यातील युवा ग्रँडमास्टर बनवण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे नमूद केले. यावेळी अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य अशोक दौंड यांनी देखील या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या या बरोबरच डॉ. विनय कुचेरिया हे गत ३० वर्षापासून आनंद चेस क्लब च्या माध्यमातून बुद्धिबळ विकासासाठी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी बुद्धिबळात प्राविण्य मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करत आहेत या बद्दल त्यांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. विनय कुचेरिया, सूत्रसंचालन सुनील कटारिया यांनी करून आभार भारत गाडेकर यांनी मानले.

# बाभुळवाडे गावात राष्ट्रवादी वाढवण्यासाठी महिलांचा सहभाग

## आ. दाते सरांच्या नेतृत्वात महिलांचा सहभाग महत्वाचा : सुषमा रावडे



**● पारनेर । वीरभूमी–**

तालुक्यातील बाभुळवाडे गावामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) पक्षाच्या वाढीसाठी पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते सर यांचे नेतृत्वाखाली महिला सक्रिय झाल्या आहेत. पक्षाच्या महिला तालुकाध्यक्ष सुषमाताई रावडे यांच्या नेतृत्वाखाली सभासद नोंदणी मोहिमेला वेग आला असून, जास्तीत जास्त महिला सभासद जोडण्यावर भर दिला जात आहे. समाजात अनेकदा महिलांनी केवळ कुटुंब सांभाळावे, असे मत व्यक्त केले जाते. मात्र, कुटुंबासह देशाच्या आणि गावाच्या विकासात महिलांचे योगदान महत्त्वाचे आहे, विकसित गावांसाठी महिलांचा सहभाग महत्वाचा असे सुषमाताई रावडे यांनी ठामपणे सांगितले. बाभुळवाडे येथील पक्षाचे सभासद नोंदणी कार्यक्रमाला पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, युवती तालुकाध्यक्ष अपर्णाताई खामकर प्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना सुषमाताई रावडे म्हणाल्या की, महिलांनी प्रत्यक्ष क्षेत्रात काम करत आपली भूमिका यशस्वीपणे पार पाडली आहे. विकसित भारत आणि विकसित गावासाठी महिलांचा सहभाग आवश्यक असल्याचे मत व्यक्त झाले. या मोहिमेमुळे गावात पक्षाची ताकद वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी भाग्यश्री साळवे, रेखा बोरुडे, सविता जगदाळे, नीलम साळवे, अंजूम पठाण, रोहिणी साळवे, पुष्पा साळवे, लक्ष्मीबाई कदम, शोभा कोरडे, वैशाली पोटे, शेवंता मंडले यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

> राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सभासद नोंदणी अंतर्गत पारनेर तालुक्यात महिलांचे संघटन उभं करणार, आ. दाते सरांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण करण्यावर भर देणार असुन संघटनेत कार्यक्षम महिलांना पद देणार, काल बाभुळवाडे येथे महिलांनी मला खुप प्रतिसाद देवून माझे बरोबर संघटनेत काम करण्याची तयारी दर्शवली, तालुक्यातील प्रत्येक गावात महिलांशी संवाद करुन त्यांचे प्रश्न समजून घेणार.
>
> **– सौ. सुषमा रावडे,**
> महिला तालुकाध्यक्षा,
> राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी,
> पारनेर

# घाटघर येथे एकदिवसीय वसुंधरा महोत्सव उत्साहात

**● अकोले । वीरभूमी–**

कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य (वन्यजीव विभाग) यांच्या विद्यमाने घाटघर येथील इको सिटी मध्ये जागतिक वसुंधरा दिनाच्या निमित्ताने स्वप्नपूर्ती- वसुंधरा महोत्सव २०२५ हा एक दिवसीय महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने घाटघर इकोसिटी, ता. अकोले जि. अहिल्यानगर येथे सह्याद्रीच्या कुशीत ३५०हून अधिक निसर्गप्रेमी, पर्यावरण अभ्यासक, वनविभागाचे विविध अधिकारी-कर्मचारी, कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य लगतच्या मुरशेत, पांजरे, उडदावणे, लव्हाळवाडी, शिंगणवाडी, साम्रद, घाडघर, कोलटेंभे, मुतखेल, शेंडी, भंडारदरा, दर्याचीवाडी, पेंडशेत आदी गावातील सर्व सरपंच, उपसरपंच, जि. प. प्रा. शाळेतील सर्व मुख्याध्यापक, समाजसेवक, पत्रकार, आपत्कालीन बचाव कार्यसंघ सदस्य, घाटघर जि. प. प्रा. शाळेतील सर्व विद्यार्थी आणि घाटघर ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपण करून करण्यात आली. कळसुबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्य वन्यजीव विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक मा. श्री. अनिल पवार यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषविले. डॉ. अशोक



धिंदळे यांनी काजव्यावर सर्वांना मार्गदर्शन केले तर अभिजीत महाले यांनी बिबट्या आणि गिधाड संवर्धनासाठी विशेष मार्गदर्शन केले.

पुढच्या महिन्यात भंडारदरा परिसरात काजवा पाहण्यासाठी राज्यभरातून अनेकजण गर्दी करतील, परंतु त्यांच्या चुकीच्या कृतीमुळे आज काजवा धोक्यात आलेला आहे. अशी चिंता डॉ. अशोक धिंदळे यांनी व्यक्त केली.स्वप्नपूर्तीच्या १८ स्वयंसेवकांनी जागतिक वन दिनानिमित्त सांगायला आलो ना आम्ही, ऐकायला पाहिजे ना तुम्ही..! या पथनाट्याचे सादरीकरण केले. जि.प.प्रा.शा. घाटघरच्या विद्यार्थिनींनी हे जंगल सारं आपलंच हाय रं, वनराईला वणवा लावायचा न्हाय रं..! या आदिवासी गाण्याचे सादरीकरण केले. त्यानंतर स्वप्नपूर्तीच्या स्वयंसेवकांनी पाणी हरवलं, कोणी ते चोरलं यावर भारुड सादर केले.

बिबट्या हा आपल्या निसर्गाचा अतिशय महत्त्वाचा घटक असून आपण त्याच्या घरात म्हणजेच जंगलात घुसखोरी केल्यामुळे तो सर्रासपणे मानवी वस्तीत वावरताना दिसतोय आणि याला माणूसच जबाबदार आहे. त्यासाठी बिबट्या हा जंगलामध्येच कसा राहिला पाहिजे यावर विशेष मार्गदर्शन अभिजीत महाले यांनी केले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी चला जाणू या वनाला या शासकीय उपक्रमाअंतर्गत आशिया खंडातील सर्वात लांब दोन क्रमांकाच्या सांधन दरीत उतरून स्वच्छता मोहीम राबवली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. रीना काकडे यांनी केले. सामाजिक बांधिलकी म्हणून रितेश वालीया यांनी एकूण ३०० स्थानिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची वाटप केले.